**<u>ठळक बातम्या</u>**

- गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात राज्यमहोत्सव गणेशोत्सवाला प्रारंभ/ ठिकठिकाणी सार्वजनिक आणि घरगुती गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना

- गणेशोत्सवानिमित्त राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या शुभेच्छा

- मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील जालन्याहून मुंबईसाठी रवाना

- क्रिकेटपटू रविचंद्रन आश्विन आयपीएल मधून निवृत्त

**आणि**

- पालघर जिल्ह्यात इमारत कोसळून दोन महिलांचा मृत्यू

**<><><><><>**

१० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला आजपासून सुरुवात झाली असून घरोघरी तसंच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमधे गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना होत आहे. यंदा गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथं गणेशमूर्तीची प्रतिस्थापना करुन पूजा - आरती केली. यावेळी राजभवनातले अधिकारी, कर्मचारीही सहभागी झाले. यंदाची राजभवनातली शाडूची मूर्ती नाशिक कारागृहातल्या कैद्यांनी तयार केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत वर्षा निवासस्थानी श्रींच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करुन पूजा केली. राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळो, आणि राज्यात सुख शांती नांदो अशी प्रार्थना त्यांनी केली असून सर्वांना शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

मुंबईतल्या गणेशोत्सवाविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड-व्हीसी- अंकिता आपटे**

*ढोलताशांचा गजर आणि गणपतीबाप्पा मोरयाच्या जयघोषात आज मुंबईसह राज्यभरात मोठ्या उत्साहात गणरायाचं आगमन होत असून घरोघरी आणि सार्वजनिक ठिकाणी बाप्पा विराजमान होत आहे. मुंबईत सुमारे बारा हजार सार्वजनिक, तर सव्वा लाख घरगुती गणपतींची प्रतिष्ठापना केली जात आहे.*

*गणेशोत्सवाचा सण सुरक्षितरीत्या साजरा व्हावा, यासाठी मुंबई महानगरपालिकेनं चोख व्यवस्था केली आहे. बंदोबस्तासाठी मुंबई शहर आणि उपनगरात १७ हजार ६०० पोलीस तैनात करण्यात आले आहेत. तसंच निगराणीसाठी अकरा हजार कॅमेरेही लावण्यात आले आहेत. यंदा प्रथमच गणेशोत्सवात ड्रोन, तसंच एआय मॉनिटरिंग सिस्टिमचा वापर केला जात आहे.*

राज्यात सर्वत्र पारंपरिक पद्धतीने स्थानिक वैशिष्ट्यांसह आणि नवनवीन कल्पना राबवून हा उत्सव साजरा होत आहे. ठिकठिकाणी सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांमधे गर्दी होत आहे. गर्दीचं नियोजन करण्यासाठी मंडळांनी आणि प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे. मुंबईत मिरवणुकांमुळे अनेक ठिकाणी वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. बेस्ट उपक्रमातर्फे खास गणपती दर्शनासाठी विशेष मार्गावर बसगाड्या चालवण्यात येत आहेत. पुण्यात गणेशोत्सवाची आरास पाहण्यासाठी निघालेल्या भाविकांच्या सोयीसाठी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो स्थानकांवरुन उशिरापर्यंत मेट्रो सेवा सुरु राहणार आहे. गणेशोत्सवानिमित्त जनजागृतीपर आणि सांस्कृतिक कलादर्शन घडवणाऱ्या कार्यक्रमांची रेलचेल असल्याचं ठिकठिकाणच्या मंडळांच्या कार्यक्रमपत्रिकांवरुन दिसत आहे.

**जळगाव** जिल्ह्यात यंदा दोन हजार ९४६ मंडळांतर्फे गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. जिल्ह्यात १६० गावांमध्ये 'एक गाव, एक गणपती' हा उपक्रम राबवला जात आहे.

**नांदेड** जिल्ह्यात शहरी भागात १ हजार सार्वजनिक तर ग्रामीण भागात तीन हजाराहून अधिक मंडळाकडून श्रींची स्थापना करण्यात येत आहे. गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रतिबंधात्मक कारवाई अंतर्गत ५२ जणांना तडीपार करण्यात आलं आहे. ५२७ सराईत गुन्हेगारावर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या ३ हजार २६७ व्यक्तीवर प्रतिबंधात्मक आदेश बजावण्यात आले आहेत. त्याचवेळी ९०४ जणांना सण, उत्सव काळात जिल्ह्यातून बाहेर काढले जात असल्याचं पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितलं.

**बीड** शहरासह जिल्हाभरामध्ये लाडक्या बाप्पाच्या आगमनासाठी बालगोपाळांसह ज्येष्ठांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे.

**नंदुरबार** मधला प्रथम मानाचा गणपती असलेल्या श्रीमंत दादा गणपती आणि श्रीमंत बाबा गणपती यांची आज मोठ्या भक्ती भावात स्थापना करण्यात आली. मंडळाचे कार्यकर्ते कोणत्याही साच्याविना काळ्या मातीपासून ही मूर्ती रथावर साकारतात.

**धुळे** शहरात बहुतांश ठिकाणी एक दिवस आधीच गणेश मूर्ती मंडपात विराजमान झाल्या आहेत. आज शास्त्रोक्त पध्दतीने प्राणप्रतिष्ठा होत आहे. धुळे जिल्ह्यात ७३६ सार्वजनिक गणेश मंडळांकडून यंदा गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. यात २४ ठिकाणी एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवली जात आहे. धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा इथल्या रावल गढी वर श्रीमंत राजा गणपतीची स्थापना राज्याचे पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते करण्यात आली.

**अहिल्यानगर** शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणेश मंदिरात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते 'श्रीं'ची प्रतिष्ठापना विधीवत पार पडली. मंदिर परिसरात सकाळपासूनच भक्तांची मोठी गर्दी झाली होती.

**नवी दिल्ली** इथल्या महाराष्ट्र परिचय केंद्रात गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. जनसामान्यांबरोबरच विविध क्षेत्रातले नामवंत मान्यवर उत्साहाने या सणाचा आनंद लुटत आहेत.

**<><><><><>**

राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यावतीनं गणेशोत्सवानिमित्त रील स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. इच्छूक व्यक्ती filmcitymumbai.org या संकेतस्थळावर २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत नोंदणी करू शकतात. स्पर्धकांनी, रील तयार करताना पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर यांसारखे विषय केंद्रस्थानी ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील बनवणं अपेक्षित आहे.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मोर्चा आज जालना जिल्ह्यातल्या आंतरवली सराटी इथून मुंबईकडे निघाला. यात मराठवड्यातील हजारो नागरिक सहभागी झाले आहेत. आपल्याला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूरध्वनीवरून चर्चेसाठी आमंत्रण दिल्याचं मनोज जरांगे यांनी वार्ताहरांना सांगितलं. चर्चेसाठी आलेल्या सरकारच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करण्याची तयारी जरांगे यांनी दाखवली, मात्र चर्चा सर्वांसमोर करण्याची अट त्यांनी ठेवली आहे. मुंबईत आझाद मैदानात आंदोलन करण्यासाठी परवानगीसाठी अर्ज

करण्याच्या न्यायालयाच्या सूचनेचं पालन करू असं जरांगे म्हणाले. हे आंदोलन शांततेत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीनं देण्यात येणाऱ्या अहिल्यादेवी क्रीडा पुरस्कारांची घोषणा आज विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी सोलापुरात केली.

पुरस्कारांचं हे पहिलंच वर्ष असून हे पुरस्कार क्रीडा, शारीरिक शिक्षण, खेळ आणि व्यायाम या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना देण्यात येणार आहेत. डॉ. आनंद चव्हाण, संतोष खेंडे, श्रीकांत शेटे, अजित संगवे, शरणबसवेश्वर वांगी हे यंदाचे मानकरी ठरले आहेत.

मानपत्र, सन्मानचिन्ह, अहिल्यादेवींची मूर्ती असं या पुरस्काराचं स्वरूप असून पुरस्काराचं वितरण येत्या शुक्रवारी विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात होणार आहे.

<><><><><>

क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनने आज आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगमधून निवृत्तीची घोषणा केली. प्रत्येक सुरुवातीला एक अंत असतो, आपल्या आयपीएल कारकीर्दीचा आज शेवट झाला असं अश्विन समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाला. अश्विनने बीसीसीआय आणि आयपीएलच्या सर्व फ्रँचाईजचे आभार मानले.

अश्विनने २००९ ला चेन्नई सुपर किंग्जकडून आपल्या आयपीएल कारकीर्दीला सुरुवात केली होती. त्यानंतर त्याने रायजिंग पुणे सुपरजायंट्स, पंजाब किंग्ज, दिल्ली कॅपिटल्स, राजस्थान रॉयल्स या संघांचं प्रतिनिधित्व केलं. यावर्षी तो पुन्हा चेन्नई सुपर किंग्ज संघात परतला होता. आयपीएलमधे दीडशे बळी घेणारा अश्विन हा हरभनज सिंगनंतरचा दुसरा फिरकी गोलंदाज ठरला.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात वसई तालुक्यातल्या नारंगी रोडजवळ चार मजली इमारतीचा काही भाग जवळच्या चाळीवर कोसळून दोन महिलांचा मृत्यू झाला. काल मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या या दुर्घटनेत अनेक रहिवासी ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. वसई - विरार महानगरपालिका , अग्निशामक दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन तुकड्या मदत आणि बचाव कार्य करत आहेत. आतापर्यंत अकरा जणांना बाहेर काढण्यात आलं आहे. ही इमारत बेकायदा होती आणि स्ट्रक्चरल ऑडिटसाठी त्यांना महापालिकेने नोटीस पाठवली होती अशी माहिती वसई-विरार महापालिका आयुक्तांनी दिली.

<><><><><>

भारतीय प्रसारण सेवेतले वरिष्ठ अधिकारी विवेक कुमार गौर यांचं आज नवी दिल्लीत निधन झालं. ते ५९ वर्षांचे होते. १९९२ च्या तुकडीतले गौर यांनी गंगटोक इथल्या आकाशवाणी केंद्रातल्या प्रादेशिक वृत्त विभागात सेवेला प्रारंभ केला होता. सध्या ते नवी दिल्लीत वृत्त सेवा विभागात कार्यरत होते. पत्रसूचना कार्यालय आणि क्षेत्रीय प्रसिद्धी संचालनालयातही त्यांनी काम केलं होतं.

//<><><><><>//